। सर्वधर्म सहिष्णुता । स्त्री-पुरुष समानता । राष्ट्रभक्ती । राष्ट्रीय एकात्मता । श्रमप्रतिष्ठा ।
। वैज्ञानिक दृष्टिकोन । नीटनेटकेपणा । सौजन्यशीलता । वक्तशीरपणा । संवेदनशीलता ।

# नीतिमूल्ये

प्रकाश साळुंखे

प्रकाशन

# नीतिमूल्ये

© सुरक्षित

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती :**
२०१६

**किंमत :**
रुपये १२०/-

## अनुक्रमणिका

१. **सर्वधर्म सहिष्णुता** ........ ३
२. **स्त्री-पुरुष समानता** ........ २०
३. **राष्ट्रभक्ती** ........ ३७
४. **राष्ट्रीय एकात्मता** ........ ५४
५. **श्रमप्रतिष्ठा** ........ ७०
६. **वैज्ञानिक दृष्टिकोन** ........ ८४
७. **नीटनेटकेपणा** ........ १००
८. **सौजन्यशीलता** ........ ११४
९. **वक्तशीरपणा** ........ १२८
१०. **संवेदनशीलता** ........ १४५

# सर्वधर्म सहिष्णुता

जहाँ डाल डाल पर, सोने कि चिडियाँ करती है बसेरा ।
वह भारत देश है मेरा ।
जहाँ सत्य, अहिंसा और धर्म का पग पग लगता डेरा ।
वो भारत देश है मेरा ।

– राजेंद्र कृष्ण

भारत देशातील रंग, रूप, वेश, भाषा व जाती आणि अनेक धर्म असले तरी लोकशाहीप्रधान हिंदुस्थान एकसंघ आहे. अनेक जाती व अनेक धर्म, पंथ यांचा समन्वय आहे. धर्माविषयी जगातील वेगवेगळ्या संतांनी, धर्मसुधारकांनी, पंडितांनी, समाज सुधारकांनी धर्माच्या व्याख्या केल्या आहेत. तर काही स्वार्थी धर्ममार्तंडांनी आपल्या धर्माला मर्यादित शब्दात कोंडले आहे. धर्म म्हणजे काय ?

आचार : परमो धर्म, आचार परम तप ।'

– स्कंदपुराण

भावार्थ : सदाचार हा पवित्र धर्म व पवित्र तप आहे.

धर्म म्हणजे सुखाचे आणि सदगतीचे साधन. सत्कर्म, सदाचार व सुव्यवस्था या पुष्पाचे एकत्रीकरण. या पुष्पांनी वेगवेगळ्या जाती धर्म वंश, पंथ यांनी गुंफलेला सुगंधित हार. जो हार सदैव सुगंध देण्याचा प्रयत्न करतो. मानवतेचा संदेश देणारा हार कधीच सुकत नाही. म्हणून संस्कृत सुभाषितकार म्हणतो –

'धर्मो विश्वस्य जगत प्रतिष्ठा ।
धर्मो रक्षति रक्षति ।'

भावार्थ : जगाचा आधार धर्म, जो धर्मपालन करतो त्याचे रक्षण धर्म करतो. संत ज्ञानेश्वर माऊलींनी धर्म कशात आहे व अखिल मानवजात सुखी केव्हा होईल एवढेच नव्हे, जलचर (पाण्यातील जीवजंतू) भूचर (पृथ्वीतलावर वावरणारे सजीव) व वनचर (वनात विहार करणारे सजीव) हे सर्व सुखी व्हावेत म्हणून पसायदान मागितले. कृपेचा वर्षाव, प्रसाद मागितला, पण हे केव्हा ? पसायदानातील अर्थाप्रमाणे वागलो तर केवढे हे विशाल मागणे !

मानव जातीत तंटे लावून द्वेषाची बीजे रोवून, मने विद्धसंक बनवून कोणाला काही मिळणार नाही. निष्पापांचे बळी घेऊन, अल्पसंख्याकांची घरे पेटवून, विशिष्ट समाजाला अपराधी समजून गुन्हेगार समजून, चोरटे समजून किंवा त्यांच्यावर घाणेरडे आरोप करून काय मिळणार! पदरी नैराश्यच येणार. हिंसा करून काय मिळणार ? सर्व जातीधर्मांतील, आबालवृद्ध, अनाथ, अपंग, मूकबधीर विकलांग सर्वांविषयी प्रेम व जिव्हाळा हवा. थोरांविषयी आदर, समवयस्कांविषयी जिव्हाळा, लहानांविषयी अपत्य प्रेम असावे. कोणाला नुसत्या शब्दाविण दुखावणे, कृतीद्वारे अपमान करणे ही सहिष्णुता नव्हे. सर्वधर्म सहिष्णुतेचे आदर्श पालन करणारे वर्तन आचरण हवे. अहिंसा तत्व हवे.

'अहिंसा परमो धर्म ।''

भावार्थ : अहिंसेसारखा पवित्र धर्म नाही.

पण अहिंसा म्हणजे काय ? प्राण्याची किंवा मानवाची हत्या न करणे किंवा बळी घेणे, जीव घेणे किंवा मृत्यूच्या अखेरच्या क्षणापर्यंत हाल हाल करून मारणे नव्हे. प्रभू येशू ख्रिस्त म्हणत आहेत–

''शत्रूवरही प्रेम करा, शेजाऱ्यावर प्रेम करा, एकमेकांवर प्रेम करा, अहिंसा म्हणजे केवळ हिंसा नव्हे.''

## ❍ धर्म स्वातंत्र्याचा अधिकार :

भारतीय संविधानात मूलभूत अधिकार दिले आहेत.

१) स्वातंत्र्य आणि धर्माचे सदसद्विवेक बुद्धीने मुक्त प्रतिज्ञापन, आचरण व प्रसार.

२) धर्मविषयक व्यवहारांची व्यवस्था पाहण्याचे स्वातंत्र्य.

३) एखाद्या विशिष्ट धर्माच्या संवर्धनाकरिता कर देण्याबाबत स्वातंत्र्य.

४) विकसित शैक्षणिक संस्थांत धार्मिक शिक्षण अथवा धार्मिक उपासना यांना उपस्थित राहण्याबाबत स्वातंत्र्य.


डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सन १९५० साली तिरंगी राष्ट्रध्वजावर अशोकचक्र अंकित करून नाण्यावर व राजमुद्रा म्हणून सारनाथ येथील चार तोंडाचा सिंह (अशोकस्तंभ) स्वीकृत करून घेतला व भारताचे राष्ट्रपती यांचेकडून ''बहुजन हिताय बहुजन सुखाय' हे ब्रीदवाक्य संमत करून घेतले. भगवान गौतम बुद्धापासून ते डॉ. आंबेडकर यांचेपर्यंत असा प्रदीर्घ लढा करूनही जातिप्रथेच्या विषवल्लीची वाढ आपणास पूर्णपणे रोखता आली नाही. या भूमीवर अनेक संत, शूर योद्धे, पंडित, धर्मप्रचारक,

समाजसुधारक झालेत. प्रत्येक महामानवाने आपापल्या परीने जाती अंताचा तसेच सर्वधर्म समभावनेचा संदेश दिला.

मानव तितुका एकच आहे,
नीच ना कोणी, उच्च ना कोणी,
हाच आपुला धर्म खरोखर हीच आपुली शाश्वत वाणी ।
पददलिताना उचलून घ्या,
प्रेमालिंगन द्या दीनास,
पशूला सोडूनी मानव व्हारे, नवधर्माचा घ्या रे ध्यास ।
राष्ट्रधर्म हा असे आपुला,
मानवधर्मच हा जाणा,
एकी शांती त्याग असे हा नवधर्माचा नवा बाणा ।

– वसंत बापट

## ❍ गौतम बुद्धांची बहुजन हिताय बहुजन सुखाय शिकवण :



बौद्ध धर्माचे धर्मसंस्थापक महामानव गौतम बुद्धांचा जन्म नेपाळ येथील लुंबिनी येथे झाला.त्यांचा जन्मकाल इ. स. पूर्व ५६३ होता. मानवी आयुष्यातील दु:खाचे मूळ कारण शोधण्यासाठी त्यांनी घरादाराचा त्याग केला. बिहार येथील गया या ठिकाणी ध्यानस्थ बसल्यावर त्यांना दिव्य ज्ञान प्राप्त झाले. त्यांनी आर्यसत्ये सांगितली.

१) दु:ख २) तृष्णा ३) दु:ख – निरोध ४) प्रतिपद या बरोबर अष्टांग मार्ग सांगितला.

१) सम्यक दृष्टी २) सम्यक विचार ३) सम्यक भाषण ४) सम्यक कृती ५) सम्यक उपजीविका ६) सम्यक व्यायाम ७) सम्यक स्मृती ८) सम्यक समाधी.

अशा प्रकारे अष्टांग मार्गाचे आठ भाग आहेत; परंतु अष्टांग पंचशीलाचा अर्थ समजून घेऊ त्या प्रमाणे आचरण करणारा मानव कधीच तंटेबखेडे करणार नाही. परधर्मियांना तुच्छ समजणार नाही. एवढेच नव्हे तर अत्याचार, हिंसा कधीच करणार नाही व सर्वजण या प्रमाणे वागले तर सर्वधर्म सहिष्णूता निर्माण होईल. सर्वांना प्रत्येका विषयी जिव्हाळा निर्माण होईल. 'पाली' भाषेचा वापर करून सर्व समाजाला उपदेश केला. पंचशील तत्वे या प्रमाणे –

अहिंसा – हिंसा करू नये.
सत्य – खोटे बोलू नये.
अस्तेय – चोरी करू नये.
इंद्रिय संयम – सुखाच्या हव्यासावर नियंत्रण ठेवणे.

मादक पदार्थ त्याग – दारू व दारूसारखे मादक पेय पिऊ नये.

गौतम बुद्ध लोकजागृती करण्यासाठी खेडोपाडी फिरले. बौद्ध संघामध्ये सर्वधर्मियांना प्रवेश होता. 'मानव श्रेष्ठ आहे, त्याहीपेक्षा मानवता श्रेष्ठ आहे' बुद्धांनी सामाजिक विषमतेवर कडाडून विरोध केला. बुद्धिप्रामाण्य हा शिकवणीचा पाया होता. कर्मठपणाविरुद्ध लढा हा त्यांच्या कृतीचा निकष होता. 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' या शिकवणीचा ठसा केवळ भारतातच नव्हे तर आजही संपूर्ण जगातील मानवजातीवर, धर्मावर ठसा उमटलेला आहे.

'जगा आणि जगू द्या' भगवान महावीरांची सहिष्णुता.

सव्वेजीवावि इंच्छंति जीविऊं, न मरिज्जिऊं ।

तम्हा पाणिवहं घोर, निग्गंथा वज्जयंति णं ।।

भावार्थ : सर्व सजीवांना जगणे प्रिय वाटते, आवडते. मृत्यू कोणालाही आवडत नाही. यासाठी प्राणिवध भयंकर आहे. सज्जन त्याचा त्याग करतात.

२४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांना जैनधर्मीय धर्मगुरू मानतात. यांचा जन्म इ. स. पूर्व ५९९ मध्ये झाला. जातिव्यवस्था, यज्ञयाग, वेदप्रामाण्य त्यांना अमान्य होते. त्यांना कोणत्याही प्रकारची सामाजिक विषमता अमान्य होती. अहिंसा या त्यांच्या मूळ तत्वाबरोबर स्त्रियांना समान संधी मिळावी यावर त्यांचा भर होता. शारीरिक व मानसिक हिंसा त्यांना अमान्य होती. बिहार राज्यातील कुंडग्राम या गावी जन्मलेले महावीर. त्यांनी १२ वर्षे तपस्या केली. त्यानंतर मात्र धर्मप्रचार करण्यात आयुष्य घालविले. 'अर्धमागधी' भाषेचा आधार घेऊन त्या भाषेतून प्रचार केला. त्यांनी पाच महाव्रते सांगितली.

१) अहिंसा २) सत्य ३) अस्तेय ४) अपरिग्रह ५) ब्रह्मचर्य. ते म्हणत –

''व्यक्तीचे मोठेपण जातीवर अवलंबून नसते, तर उत्तम चारित्र्यावर अवलंबून असते.''

महावीरांनी त्रिरत्ने सांगितली १) सम्यक दर्शन २) सम्यक ज्ञान ३) सम्यक चारित्र्य. सर्व प्राणिमात्रांवर दया करा. अंतकरणात दया व करुणा असू द्या. जगा आणि जगू द्या. त्यांच्या या माणुसकीच्या महान तत्वज्ञानाने वागणारे सर्वधर्मीय सुखी झाल्याशिवाय राहणार नाहीत. सर्व बांधवांविषयी सहिष्णुता बाळगणारे ते महान संत होते.

## ❍ ख्रिश्चन धर्माची सर्वधर्म सहिष्णुता :

दया धर्म का मूल है, पाप मूल अभिमान ।

रामचरितमानस (संत तुलसीदास)

या धर्माच्या संदेशाप्रमाणे वागणारे महान शांतिरत्न, शांतिप्रिय प्रभू येशू ख्रिस्त होते. क्रुसावर चढवले असताना शरीर रक्तबंबाळ झालेले असताना शरीरात असह्य वेदना होत असताना देखील शिक्षा करणाऱ्यांना माफ करणारा महान प्रभू. एवढेच नव्हे येशू त्या प्रसंगी म्हणाले,

''हे परमेश्वरा या लोकांना माफ कर, ते काय करीत आहेत, हेच त्यांना कळत नाही, त्यांना माफ कर.''

लॅटिन भाषेत 'बायबल' ग्रंथ होता. ही भाषा सर्वसामान्यांना कळत नव्हती. याचा गैरफायदा ख्रिस्ती धर्मपीठाचे सर्वश्रेष्ठ धर्मगुरू पोप घेत होते, धर्माचा खरा अर्थ, स्वरूप सर्वसामान्यांना कळत नव्हते. समाजाचे आचार – विचार आणि व्यावहारिक जीवन यांचे नियमन करण्याचे काम धर्मसंस्थेचे होते; पण धर्ममार्तंडांनी सर्व जाति – धर्मांमध्ये संघर्ष निर्माण केला. म्हणून प्रभू येशूंनी धर्माचा खरा अर्थ व स्वरूप सर्व समाजाला सर्वधर्मियांना पटवून दिले व खऱ्या धर्माप्रमाणे वागा हा संदेश व उपदेश केला. म्हणून त्यांना धर्मद्रोही समजून क्रुसावर चढवून अंगात खिळे ठोकले. अशा प्रकारे जगाच्या कल्याणासाठी प्रभू येशू नावाच्या विभूतीने जन्म सार्थक केला.

## ❍ ''पारशी गाथा'' सर्वधर्मियांना संदेश :

यथा अहू वदूयो । अथा रतुश अबातचीत हचा
कड्र:हँडश दुज्दा मेनडे हो
ष्ये ओथननाँम अड्:हँडेश मज्दाइ ।
क्षथ्रँमचा अहुराइ आ यिम्
द्रि गुण्योददत वास्तारेम ।।

भावार्थ : नैतिक सचोटी असलेला धार्मिक नेता, राज्यकर्त्याप्रमाणे स्वतंत्र असतो. त्यांची कृत्ये सर्वज्ञाकडून झालेली असतात. त्यांनाच चांगल्या मनाचा पुरस्कार मिळतो. (त्यांची शुद्ध मने परमेश्वराची देणगी असते) गरिबांना आधार देण्याची शक्ती अहुरमज्दाची (परमेश्वराची) शक्ती असते.

## ❍ प्रेषित मुहम्मद व अलम सर्वांकरिता :

'यतो धर्म स्नतो जयो, यतो धर्मस्ततो अभ्युदय'

भावार्थ : जेथे धर्म तेथे विजय व धर्म तेथे उन्नती–प्रगती

प्रेषित मुहम्मद स अलम कुरैशे या प्रतिष्ठित घराण्यात जन्मले. जन्मदिनांक २० एप्रिल ५७१. सर्वश्रेष्ठ ईश्वर म्हणतो –

''हे पैगंबर मुहम्मद आम्ही तर तुम्हाला पृथ्वीवरील मानव जातीच्या कल्याणाकरिता कृपा बनवून पाठविले आहे.''

याचाच अर्थ 'इस्लाम' हा एका धर्मापुरता मर्यादित नाही तर संपूर्ण मानव जातीच्या कल्याणार्थ व ईश्वरांप्रती श्रद्धेची शिकवणूक देणारा आहे. याच गोष्टीचा प्रचार मुहम्मद (स) यांनी केला. त्यांनी मक्केमध्ये पूर्वापार चालत आलेली रूढी, पुरोहितांविरुद्ध जागृतीचे रण फुंकले. त्यांनी दैनंदिन जीवनात व त्यांच्या अनुयायांच्या अनुभवातून व्यक्त केलेले विचार, नोंदी यांचे संकलन केले आहे. या ग्रंथसंपदेस 'हदीस' संबोधले जाते. इस्लाम हा फक्त मुस्लिमांकरिता नाही. हा धर्म सर्वांसाठी अवतरित झाला आहे. तसेच एकमेकांचे प्राण घेण्यास संपत्ती लुटण्यास आणि अब्रूचे नुकसान करण्यास हराम

(निषिद्ध) व महापाप ठरविण्यात आले आहे. समस्त निर्मिती (मानव) सर्वश्रेष्ठ अल्लाचे कुटुंब आहे. जो या कुटुंबाशी (मानवजातीशी) उत्तम वर्तन करतो तो अल्लास सर्वात प्रिय आहे. या वचनावरून इस्लाम धर्माची महानता व विश्वबंधुता दिसून येते.

मजहब नही सिखाता आपसमें बैर रखना ।
हिंदी है हम, वतन है हिंदुस्थान हमारा ।

कवि – इकबाल

## ❍ गुरू ग्रंथसाहेब नानकांची सहिष्णुता :



परकियांची दादागिरी व आघातांनी प्रस्थापित शीख धर्म खिळखिळा होऊन गेला होता. अशा वेळी पंजाबातील तळवंडी या गावी १५ एप्रिल १४६९ या दिवशी काळू मेहता व तृप्ता यांचे पोटी जन्माला आलेले रत्न म्हणजेच नानक साहेब. सुसंस्कृत व सदाचारी घराणे होते. धर्माला प्रतिष्ठा प्राप्त करवून त्यांनी पंजाबचे जीवन समृद्ध केले. भारतावर कायमचा ठसा राहावा अशा तऱ्हेचा एक समर्थ धर्मपंथ त्यांनी स्थापन केला.

एक दिवस नानक स्नानासाठी नदीवर गेले. नदीत उतरले आणि अदृश्य झाले. नानक साहेब बुडाले असा जिकडे तिकडे हाहाकार झाला; परंतु खूप शोध करूनही ते सापडले नाहीत. नानकांनी इहलोकीची यात्रा संपविली असा सर्वांचा ग्रह झाला. अखेर तिसऱ्या दिवशी ते अचानक पाण्यातून वर आले. असे सांगतात की या तीन दिवसात त्यांना परमेश्वराचे सान्निध्य लाभले होते.

प्राणिमात्र अनंत वेदनांनी संतप्त आहेत आणि शीड नसलेल्या बोटीप्रमाणे मानवजात कोणीकडे तरी भरकटत चालली आहे हे पाहून त्यांनी समाजाच्या उद्धारासाठी आपले जीवन समर्पित करण्याचा निश्चय केला. आपला शिष्य मर्दाना याला बरोबर घेऊन ते खरोखरच भूतलावर संचार करण्यासाठी निघाले. हे दोघे जेथे जेथे जात त्या त्या ठिकाणी दलित, उपेक्षित यांच्यामध्ये मिसळत. त्यांची विचारपूस करीत, त्यांना धीर देत. मार्ग दाखवित. त्यामुळे दलितांचा उद्धारकर्ता म्हणून त्यांची कीर्ती पसरली. त्यांनी जो धर्म सांगितला त्याची तीन सूत्रे – १) कर्तव्यकर्म २) प्रार्थना ३) गौरव

गुरू ग्रंथसाहेब या ग्रंथाची रचना करून धर्माचे सत्य स्वरूप शीख बांधवांच्या पुढे प्रदर्शित केले. विजयादशमीच्या मंगल दिवशी अत्यंत शांत चित्ताने १५३९ साली स्वर्गलोकी प्रयाण केले.

## ❍ मदर तेरेसा – द ग्रेट मदर :

युगोस्लाव्हियातील स्कोपजे गावी जन्माला आलेल्या ॲग्नेस गोंकझा बोजाक्झिरू म्हणजेच मदर तेरेसा. २७ ऑगस्ट १९१० रोजी जन्म. मदर तेरेसा यांनी कलकत्ता येथे गरीब मुले यांचेसाठी आरोग्यशाळा १९४८ साली सुरू केली. १९५२ साली रुग्णसेवेसाठी निर्मल हृदय संस्था, तसेच १९६५ साली कुष्ठरोग्यांच्या सेवेसाठी 'शांती सागर' वसाहत निर्माण केली. १९७६ साली 'आशादान' नावाची संस्था स्थापन करून सर्वांची सेवा करण्याचे व्रत अंगिकारले. मृत्यूशय्येवर असलेल्या विविध

जातीच्या, धर्माच्या पंथांच्या लोकांसाठी अखेरचा क्षण आनंदमयी व्हावा म्हणून प्रयत्न केले.



पुढील काळात त्यांनी अनाथ बालके, अपंग, अंध, वृद्ध व निराधार कुष्ठरोगी इत्यादींच्या साठी तसेच दीन दुबळ्या व उपेक्षित घटकांसाठी हजारो केंद्रे उभी केली. त्यांना १९८० साली भारतरत्न हो सर्वोच्च बहुमान मिळाला. अशा ग्रेट मदर १९९७ साली अनंतात विलिन झाल्या.

## ❍ आंध्रचा कबीर – तेलगू कवी वेमन्ना :

खोटे बोलू नका, खोटे वागू नका, जातिभेद पाळू नका, अस्पृश्यता पाळू नका, अंधश्रद्धाना थारा देऊ नका. वासनांचा त्याग करा, सर्व प्राणिमात्रांशी समानतेने वागा, असा समानतेचा संदेश देणारा तेलगू कवि वेमन्ना 'कोंडवीडु' नामक गावी जन्मला. मात्र गांदीकोटला त्याने दीर्घकाळ वास्तव्य केले.

हृदयमुन नुन्त ईशुनि तोलियाक ।
शिल्लक केल्ल स्त्रोकु जीकलार ।।
शिल्लनेमियुंड जीवलंदे काक ।
विश्वदभिराम विनुर वेन ।।

भावार्थ : वेडा मनुष्य हृदयस्थ ईश्वराला न ओळखता दगडाची पूजा करतो. परमेश्वर तर सर्व प्राणिमात्रांच्या हृदयात असतो.

वेमन्नाच्या दृष्टिपथात जेवढा प्रदेश तेवढा सर्व प्रदेश व सर्व समाज त्याने डोळसपणे पाहिला. समाजाच्या प्रत्येक अंगोपांगाचा त्याने जाणतेपणी आढावा घेतला. जे दोष जाणवले त्यावर कडाडून हल्ला चढवला. त्या काळी सर्वधर्म पंथ वगैरे भेदाभेदाची दलदल माजली होती. खरा धर्म लयाला गेला होता. लोक क्षुल्लक गोष्टी वरून हमरा तुमरीवर येत व जन्माचे वैरी होऊन बसत. वेमन्नाने हे पाहिले आणि जनसामान्यांना परस्पर सहिष्णुतेचे महत्त्व पटवून देऊ लागला. आपल्या करारी वृत्तीने लोकांना सर्वधर्म समभावनेचा संदेश देत राहिला. लोकांना सुधारत राहिला. त्याचे शब्द मर्माला भिडत. तो नेमका वेदनेचा वेध घेत होता. वेमन्नाच्या या विचारांचा फार परिणाम झाला. या विचारांचा अर्थ सर्वसामान्यांना कळला. म्हणून त्याच्या विचारांचा वारसा जागविणारा एक संघ आंध्रात तयार झाला व त्याचा वारसा पुढे चालवू लागला.

आंध्रातील अनंतपूर जिल्ह्यातील कटारूपल्ले गावी त्याने १४८० साली रामनवमीला जिवंत समाधी घेतली.

## ❍ सूफी संताचा – सर्वधर्म समभाव :

कोणताही धर्म वा पंथ विद्वेषावर आधारलेला नसतो. विद्वेष आला कि ओघानेच संघर्ष आला की, कुणाचा तरी विध्वंस होतो. विध्वंस झाला की त्यांची परिणिती म्हणून मन:शांती नि शांतता नाहीशी होते. ही सारी नकारात्मकता असते. अन्य धर्मांच्या संतांप्रमाणे सूफी संतांची

मानसिकता सकारात्मक आहे. विधायक आहे. विश्वशांतीच्या ध्येयाकडे वाटचाल करणारी आहे. यामुळेच सर्व सूफी संत सर्व प्राणिमात्र्यांवर प्रेम करणारे होते. सर्व प्राणिमात्रांच्या कल्याणाची कामना बाळगणारे होते.

मध्ययुगात सूफी संत वजीर – उल – मुलक मुंतोजी शहा, मुंतोजी ब्राह्मणी बहमनी उर्फ (मृत्युंजय) अलमखान (अल्लाखान) शेखमहम्मद इत्यादी संतकवी होऊन गेले. मराठी साहित्याच्या दालनावर सूफी संतांचा प्रभाव दिसतो. यातील अनेक मुस्लिम संत महाराष्ट्रातील अनेक धर्म संप्रदायांशी एकरूप झाले असून त्यांनी आपल्या काव्याच्या व कार्याच्या माध्यमातून एकात्मतेचा व शांतीचा संदेश दिला. उपदेश केला व महाराष्ट्रातील विविध धर्मसंप्रदायांमध्ये सामंजस्य प्रस्थापित केले. सूफी परंपरेच्या तत्वज्ञानात म्हणजे तसव्वुफ मध्ये विश्वकल्याणाचा संदेश दिला व विश्वशांतीच्या पुरस्कारातून सर्व धर्मात अभेदता असल्याचा विचार मांडता येतो. कोणत्याही धर्माचे संत वा महापुरुष ज्या सर्वोच्च पातळीवर जातात, ती मानसिकता विश्वात्मकतेची असते. मानवतेची असते. तिथे संकुचिततेला वाव नसतो. 'एका हातात तलवार व एका हातात कुराण ' ही उक्ती त्यांच्याबाबत मुळीच खरी नाही. चाँद बोधले , शेख महम्मद अल्लाखान, शहामुनी, शेख सुलतान, मुंतोजी बामणी यापैकी कोणत्या मुस्लिम संतांनी स्वधर्माचा प्रचार व प्रसार केला ? ते स्वधर्म प्रसारक नव्हते तर वर उल्लेख केल्याप्रमाणे सर्वधर्म समभाव बाळगणारे व शांतीप्रिय होते.

''दया नदी महातीरे सर्वे धर्मास्तृणांकुशः ।
तस्या शोषमुपेयाता, कियत ते नन्दति चिरात ।।

पार्श्वनाथ (कल्पसूत्र टीका)

भावार्थ : दया नावाची महानदी आहे. तिच्या किनाऱ्यावर सर्वधर्म, परोपकार इत्यादी सर्व धर्म वृद्धिंगत होतात व त्या नदीचा किनारा हिरवळमय बनतो. जर दया नावाची नदी कोरडी पडली वआटली तर सर्व धर्मांची हिरवळ, शिकवण, उपदेशका सुकायला वेळ लागणार नाही. म्हणूनच सर्व संत, महंत ऋषीमुनी, समाज सुधारकांनी दया व परोपकार सर्वश्रेष्ठ मानले आहेत.

## ❍ छत्रपती शिवरायांची सर्वधर्म सहिष्णूता :

बहु असोत सुंदर, संपन्न की महा ।
प्रिय आमुचा एक महाराष्ट्र देश हा ।।

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक माता जिजाऊ व शहाजीराजे यांचे पोटी जन्मलेले नररत्न १६ व्या व १७ व्या शतकातील महाराष्ट्राला लाभलेला शूर योद्धा, कुशल प्रशासक, न्यायप्रिय राजा परस्त्रीस मातेसमान मानणारा सुपुत्र म्हणजेच छ. शिवाजीराजे.

शूर आम्ही सरदार आम्हाला, काय कुणाची भीती ।
देश, देव, अन धर्मासाठी प्राण घेतले हाती ।